# महात्मा गांधीच्या विचारांचा चिकित्सक अभ्यास

**मठपती ऋषीकेश सुभाष**

**गोषवारा**

गांधींच्या विचारांचे महत्त्व त्यांच्या राजकीय यशापुरते मर्यादित नाही. त्यांनी राजकारणाला नैतिकतेची जोड देण्याचा प्रयत्न केला आणि साध्य व साधन यांच्यातील संबंधावर विशेष भर दिला. तथापि, त्यांच्या विचारांवर अनेक चिकित्सकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. अहिंसेची व्यवहार्यता, ग्रामकेंद्रित अर्थव्यवस्थेच्या मर्यादा, औद्योगिकीकरणाविषयीची भूमिका, जातिव्यवस्थेबाबतची भूमिका आणि आधुनिक राज्यव्यवस्थेशी संबंधित त्यांच्या संकल्पना यांवर विविध पातळ्यांवर टीका झाली आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये गांधींच्या विचारांचे वर्णन करण्याबरोबरच त्यांचे चिकित्सक आणि समकालीन संदर्भातील मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे. महात्मा गांधी हे आधुनिक भारताच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि नैतिक विचारविश्वावर दीर्घकालीन प्रभाव टाकणारे महत्त्वपूर्ण विचारवंत होते. त्यांनी स्वातंत्र्यलढ्याला केवळ राजकीय संघर्षाचे स्वरूप न देता त्याला सत्य, अहिंसा, नैतिकता, आत्मशुद्धी आणि सामाजिक परिवर्तन यांच्याशी जोडले. गांधींच्या विचारांचा केंद्रबिंदू सत्य आणि अहिंसा हा होता. सत्याचा शोध घेताना अहिंसक मार्गाचा अवलंब करणे, अन्यायाविरुद्ध सत्याग्रह करणे आणि समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी कार्य करणे ही त्यांच्या विचारधारेची प्रमुख वैशिष्ट्ये होती. त्याचबरोबर त्यांनी स्वराज्य, ग्रामस्वराज्य, स्वदेशी, खादी, ट्रस्टीशिप, सर्वोदय, मूलभूत शिक्षण आणि धार्मिक सहिष्णुता यांसारख्या संकल्पना मांडल्या.

**कीवर्ड्स -** महात्मा गांधी, सत्य, अहिंसा, सत्याग्रह, स्वराज्य, ग्रामस्वराज्य, सर्वोदय, स्वदेशी, ट्रस्टीशिप, नैतिक राजकारण

## प्रस्तावना

महात्मा गांधीजींनी समकालीन परिस्थितीला प्रतिसाद देत असतांना संपूर्ण भारताचा तुलनात्मक अभ्यास करुन भारतीय समाजात असलेल्या समस्या समजून घेण्याबरोबर प्रकिय शक्तींचा सामना करण्यासाठी विविध साधनाचा वेळ प्रसंगी उपयोग केलेला दिसून येतो. यात सत्य, अहिंसा, सत्याग्रह, उपवास, आंदोलने, हिजरत, हडताळ आदी साधनाचा उपयोग केलेला दिसून येतो. या गांधीजीनी वेळ प्रसंगी वापर केलेल्या साधनांना गांधीवादाच्या चष्ध्यातून पाहिले जाते. गांधी हे प्लेटो, ॲरिस्टॉटल, कोटिल्य, मार्क्स इत्यादी प्रमाणे तत्वज्ञानी नसून ते धार्मिक भावनने प्रेरित झाले होते. गांधी दर्शनामध्ये प्लेटो, ॲरिस्टॉटल, मार्क्स, हाब्ज, लॉक, रुशो इत्यादीच्या सिध्दांताप्रमाणे त्यांच्या लिखाणात क्रमबध्द पणा असलेला दिसून येत नाही. महात्मा गांधी यानी समकालीन परिस्थितीला प्रतीसाद देत असतांना मानवी जीवनापुढे येणाऱ्या महाकाय समस्या सोडवण्यासाठी तत्कालीन परिस्थितीनुरुप आपल्या विचारांची शिदोरी जगाला दिली. म्हणून

तत्कालीन विभिन्न परिस्थितीला प्रतिसाद दिल्या गेलेल्या त्यांच्या विचारात काही प्रमाणात विसंगती दिसत असली तरी गांधीवादाचे महत्व कमी होताना दिसून येत नाही. उलट ते आज जागतिक पटलावर नेल्सन मंडेला, सांग सुकी आदी अनुयायाच्या रुपाने प्रसार होताना दिसून येत आहे. गांधीजीनी केवळ भारतातच कार्य केले नसून त्यांनी आफ्रिका खंडाबरोबर यूरोप तसेच आशिया खंडात कार्य केले आहे. त्यांच्या विचारांची संपूर्ण विश्वच भारावून गेल्यामुळे यूनोनो २ अक्टुबर गांधीचा जन्म दिवस जागतिक शार्तता दिवस म्हणून साजरा केला जात आहे.

गांधीजीचे जीवन म्हणजे त्यांच्या विचार आणि आदशांची अभिव्यक्ती आहे. त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांना व जगाला दिलेल्या महान आदर्शपूर्ण संदेशाना त्यांच्या जीवनापासून वेगळे केल्या जांउ शकत नाही. असे असले तरी पण सत्य, अहिंसा, शांतता आणि ग्रामिण विकासाचा प्रश्न समोर येता तेव्हा भारतातच काय जागतिक पटलावर गांधीजीचे चित्र समोर येते. परंतु हे फारसे महत्त्वाचे नसून गांधीना जाणून भूजुन समोर आणल्या गेले आहे. गांधीचे तत्वज्ञान हे स्वतःनसून मुळात ते गोतम बुध्द याचेच आहे कारण भारतामध्ये गौतम बुध्द याच्या काळामध्ये शांतता बरोबरच सर्वत्र विकासाचा आलेख चढता राहिलेला दिसून येतो. गौतम बुध्दाच्या विचारामुळे आशियातील चीन, जापान, भुटान, श्रीलंका आदी देशामध्ये गौतम बध्दाच्या विचारांचा ड्रापाट्याने विस्तार होत गेलेला दिसून येतो. चीन व जापान या राष्ट्राने बुध्दाच्या तत्वज्ञानाचा अबलंब करुन झापाट्याने आपला आर्थिक विकास साधलेला दिसून येतो. परंतु भारतामध्ये बुध्दाच्या तत्वज्ञानाला छेद देवून महात्मा गांधीच्या विचारांचा स्वीकार केला गेल्याने आज पावेतो भारताचा कोणताच प्रश्न सुटलेला दिसून येत नाही. गौतम बुध्दाच्या व चार्वाकाच्या तत्वज्ञानाला हाजारो वर्षाचा इतिहास असतांना त्याच्याकडे मुदामहून दुर्लक्ष केले जात आहे. बुध्दाच्या विकासाची ३५०० वर्षा पूर्वी ग्रीकला धसकी भरली असता त्यानी अशोक सम्म्राटा पराभूत करण्यासाठी सिकंदरने भारतावर आक्रमण केले पण त्याला आपले लक्ष साध्य करता आले नाही त्याचा मानहानीकारक पराभव झाला होता.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. महात्मा गांधींच्या प्रमुख विचारांचे स्वरूप स्पष्ट करणे.
2. सत्य आणि अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे.
3. सत्याग्रहाच्या संकल्पनेचे विश्लेषण करणे.
4. गांधींच्या स्वराज्य आणि ग्रामस्वराज्याच्या कल्पनांचा अभ्यास करणे.
5. त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक विचारांचे परीक्षण करणे.
6. गांधींच्या विचारांतील मर्यादा व त्यांच्यावर झालेली टीका समजून घेणे.
7. समकालीन समाजाच्या संदर्भात गांधीवादी विचारांची उपयुक्तता तपासणे.

**संशोधन पद्धती**

या संशोधनासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि चिकित्सक-विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. गांधींची स्वतःची पुस्तके, भाषणे, लेख, पत्रे आणि त्यांच्या विचारांचे संकलित साहित्य हे प्राथमिक स्रोत म्हणून विचारात घेतले आहे. *हिंद स्वराज*, *Satyagraha in South Africa*, *The Story of My Experiments with Truth* आणि *Constructive Programme: Its Meaning and Place* यांसारख्या ग्रंथांचा विशेष संदर्भ घेण्यात आला आहे. गांधी हेरिटेज पोर्टलवर गांधींच्या प्रमुख ग्रंथांची आणि त्यांच्या संकलित साहित्याची अधिकृत नोंद उपलब्ध आहे.

**गांधी तत्वज्ञान आणि २१ वे शतक :-**

२१ व्या शतकाचा जागतिक पटलावरचा धावता आढावा घेतला असता असे दिसून येते की, विकसनशिल व अतिमागास म्हणजे लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि आशिया या तीसऱ्या दुनियेत डोकावले असता या राष्ट्रामध्ये अंतर्गत बडाळी बरोबरच वाढती गरिबी, बेकारी, कुपोषण, शिक्षण, आरोग्य, अशांतता, भ्रष्टाचार, अकार्यक्षम राजकीय नेते, फुटिरतावादी चळवळीला आलेला उत आदी प्रश्नामुळे सर्वसमान्य जनतेला दैनदिन जीवन जगणे अशक्य झाले आहे. या तिसऱ्या दुनियेत चाललेले विकसित राष्ट्राच्या उद्योगामुळे आर्थिक, सामाजिक, राजकीय कार्यात शोषण सर्रास पणे केले जात आहे. पत्रकार, विदेशी राजदूत आणि वत्तपत्रकारावर होणारे हल्ले, **2** स्त्रियांवरील वाढते अत्याचार, सार्वजनिक ठिकाणे, पक्षकार्यालये या ठिकाणी वारंवार होणारे राडे, नागरी जीवनातील वाढता हिंसाचार व खून, धमकावने, वाढती विषमता, जागतिकरणाची खाउजा संकल्पना, सुरक्षा व्यवस्थेच्या अद्ययावतीकरणातून जाणवणारी कमालीची अस्थिरता आणि जागतिक पटलावरील धार्मिक, वाशिक, जातीय, प्रांतीय अस्मितेचे प्रश्न आदी मुळे तिसऱ्या दुनिया समोर अनेक प्रश्न उभे टाकलेले आहेत. अशा परिस्थितीत या तिसऱ्या दुनियेला आपल्या स्वतः च्या पायावर भक्कमपणे उभे रावयाचे असेल तर त्यांना गांधी तत्वज्ञानाचा आधार घेणे उपयुक्त ठरु शकते. गांधीजीच्या सत्य व अहिंसा बरोबर ग्रामद्योगाची संकल्पना तिसऱ्या दुनियेला तारणारी दिसून येते.

**बहुराष्ट्रीय कंपन्या व गांधी नीती :-**

जागतिक पटलावर साम्यवादी आणि भांडवलशाही विचारधारेने धुमाकुळ घातल्यामुळे अविकसनशिल राष्ट्रांना मोठ्या प्रमाणात यांचा फटका बसला आहे. विकसित राष्ट्रांनी तिसऱ्या दुनियेतील राष्ट्राना देशोधडीला लावण्यासाठी विकासाचे गाजर समोर करुन बहुराष्ट्रीय कंपन्यी आपले साम्राज्य प्रस्थापित करण्यासाठी खुले आर्थिक धोरण म्हणजे खाउजा ही संकल्पना समोर आणली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्याच्या उद्योगामुळे तिसऱ्या दुनियेत विषमता, बेरोजगारी, शोषण आदि समस्या मध्ये वाढ झाल्याने पुन्हा एकदा विकसित राष्ट्राचा आर्थिक साम्राज्यवादमध्ये राष्ट्र खितपट

पडलेली आहेत. अशा परिस्थितीत तिसऱ्या दुनियेला तारण्यासाठी गांधीजींच्या ग्रामद्योग संकल्पना निश्चित तारु शकते.

**जागतिक धर्म नीति आणि गांधी मानवतावाद :-**

जगाच्या इतिहासात आजपर्यंत जातिधर्माच्या नावावरून जेवढी माणसे मूत्युमुखी पडली असतील तेवढे कोणत्याही कारणामुळे मृत्युमुखी पडले नाहीत. पहिल्या महायुध्दानंतर जागतिक पटलावर उदयास आलेल्या हिटलर याने तर जर्मनीच्या हासाला ज्यु शिय लोकांना जबाबदार धरुन त्याना मारण्यासाठी कत्तलकारख उभारुन लाखो लोकांचे हिटलरने शिरकान केले आहे. सद्यःस्थितीमध्ये अरब राष्ट्रात जो धुमाकुळ माजला आहे याने तर अतिशय उग्र रुप धारण केले आहे. या हिंसाचारात दररोज निष्पाप लोकांचे शेकडो बळी जात आहेत याला कारण देखील धार्मिकच असलेले दिसून येते. अरब राष्ट्रांमध्ये उदयास आलेल्या या नेतृत्वामुळे संपूर्ण जगात अशांतता पसरली आहे. या परिस्थितीला हाताळावयाचे असेल तर गांधीजींचा मानवतावाद अतिशय महत्त्वाचा ठरु शकतो. गांधीजींच्या मानवतावादाचे ध्येय सर्वधर्मसमभाव असून या जगात कोणताही श्रेष्ठ धर्म हा कमकुवत धर्मावर अन्याय अत्याचार करणार नाही अशी शिकवण देतो. गांधीजींच्या मानवतावादाची समकालीन परिस्थितीला आवश्यकता असलेली दिसून येते.

**आधुनिक लोकशाही राज्य व गींचे ग्रामराज्य :-**

दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक साम्राज्यवादाचा ऱ्हास झाल्यानंतर साम्राज्यवादात वर्षानुवर्षे खितपत पडलेली तिसऱ्या दुनियेतील अनेक राष्ट्रांचा जागतिक पटलावर उदय झाला. या नव्याने उदयास आलेल्या राष्ट्रांनी कोणत्याही लष्करी संघनेत शामिल न होता लोकशाही पध्दतीचा स्वीकार केलेला दिसून येतो. परंतु या राष्ट्रातील नैसर्गिक साधनसंपत्ती विकसित राष्ट्रांनी लटुण्याबरोबर येथील राष्ट्रांच्या अंतर्गत राजकारणात सातत्याने हस्तक्षेप केलेला दिसून येतो. यामुळे या राष्ट्रात जवळपास लोकशाही रुजलेली दिसून येत नाही. याचे कारण असे की, विकसित राष्ट्रांनी आपल्याला हवे असलेले आणि आपल्या कुबड्या घेऊन चालणारे शासनच बहुतेक अविकसनशिल देशात सत्तेवर आणले. यामुळे तेथील जनतेला हव्हे असलेली लोकशाही आजपावेतो रुजवता आलेली नाही. उदा. अरब राष्ट्र, म्यानमार, मालदिव, पाकिस्तान आदी राष्ट्रामध्ये लोकशाही सरकार सत्तेवर आले असले तरी येथील हुकुमशाही प्रवृतीने भारावून गेलेले लष्कर प्रमुखानेच लोकशाहीचा बळी घेतलेला दिसून येतो. या राष्ट्रामध्ये लोकशाहीचे विकेंद्रीकरण होण्या ऐवजी दिवसेंदिवस लोकशाहीचे केंद्रीकरणच झालेले होतांना दिसून येत राष्ट्रामध्ये लोकशाहीचे विकेंद्रीकरण होण्या ऐवजी दिवसेंदिवस लोकशाहीचे केंद्रीकरणच झालेले होतांना दिसून येत आहे येथील जनतेचे कोणतेही प्रश्न शासन यंत्रणेने सोडवलेले नाहीत. त्यामुळे आधुनिक लोकशाही राज्यामध्ये अराजकता माजल्यामुळे सर्वसामान्य जीवन जगणे अशक्य झाले झाले आहे. या

राष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला आपला स्वास मोकळ्या वातावरणात द्यावयाचा असेल तर त्यांना गांधीजीनी प्रतिपादित केलेली ग्रामस्वराज्य संकल्पना अस्तित्वात आणने काळाची गरज बनली आहे.

**सारांश :-**

महात्मा गांधींचे विचार हे केवळ भारतीय स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित राजकीय तत्त्वज्ञान नसून ते नैतिकता, समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था, शिक्षण, धर्म आणि मानवी जीवन यांचा व्यापक विचार करणारे तत्त्वज्ञान आहे. सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या त्यांच्या मूलभूत संकल्पनांनी राजकीय संघर्षाला नैतिक अधिष्ठान दिले. स्वराज्य आणि ग्रामस्वराज्याच्या माध्यमातून त्यांनी राजकीय स्वातंत्र्याला सामाजिक व नैतिक स्वातंत्र्याशी जोडले. स्वदेशी, खादी, सर्वोदय आणि ट्रस्टीशिपच्या माध्यमातून त्यांनी आर्थिक जीवनात मानवी मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांना महत्त्व दिले. तथापि, गांधींच्या विचारांचे अंधानुकरण करण्याऐवजी त्यांचा चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक आहे. अहिंसेची व्यवहार्यता, औद्योगिकीकरणावरील त्यांची भूमिका, ग्रामस्वराज्याच्या मर्यादा, ट्रस्टीशिपची व्यवहार्यता आणि जातिव्यवस्थेविषयीची भूमिका यांचा आधुनिक सामाजिक व राजकीय विचारांच्या संदर्भात पुनर्विचार करणे गरजेचे आहे. एकूणच, गांधींच्या विचारांचे महत्त्व त्यांच्या प्रत्येक प्रस्तावाचा शब्दशः स्वीकार करण्यात नसून सत्य, अहिंसा, नैतिक राजकारण, सामाजिक न्याय, विकेंद्रीकरण आणि मानवकेंद्री विकास या मूल्यांवर नव्याने विचार करण्यास ते प्रवृत्त करतात, यात आहे. म्हणूनच बदलत्या सामाजिक परिस्थितीत गांधीवादी विचारांचे पुनर्वाचन आणि चिकित्सक पुनर्मूल्यांकन आवश्यक ठरते.

संदर्भ सूची :-

१. संपादक पंजाबराव चव्हाण, मूल्यव्यवस्था गांधी विचार, निर्मल प्रकाशन नांदेड
२. जगन फडणीस, महात्म्याची अखेर, प्रकाशन सुनील मेहता सदाशिव पेठ पुणे
३. श्रीपाद केळकर, ओकला चलो रे, प्रकाशक गोपाळ मोकाशी, सदाशिव पेठ पुणे
४. माधव गडकरी, शेवटचे गांधी, कोहिनूर प्रकाशन मुंबई